International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor – 7.065
Vol.8 No.1 Sept – Oct 2020

# भारतीय सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार आणि कार्य

**डॉ. योगीराज. एस. उरकुडे**
राज्यशास्त्र विभाग, भगवंतराव कला महाविद्यालय सिरोंचा.
**Email-** yogiraj1971@gmail.com

न्यायदान करणारे मंडळ म्हणजे न्याय मंडळ दोन व्यक्तींमध्ये निर्माण झालेला वाद सोडविणे आणि निर्णय देणे तसेच व्यक्ती आणि सरकार यांच्यातील वाद सोडवून निर्णय देणे किंवा दोन सरकारमध्ये निर्माण झालेला वाद सोडवून निर्णय देण्याचे काम न्याय मंडळाचे आहे भारतात सर्वश्रेष्ठ न्यायालय म्हणजे सर्वोच्च न्यायालय होय.सर्वोच्च न्यायालयाची स्थापना 26 जानेवारी 1950 ला झाली सर्वोच्च न्यायालय नवी दिल्ली येथे आहे सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय अंतिम असतो तो सर्वांना मान्य करावा लागतो

**रचना:-**

**१) न्यायाधीशांची संख्या :-** सर्वोच्च न्यायालय स्थापन झाले तेव्हा न्यायाधीशांची संख्या कमी होती त्यात वाढ करण्यात आली आणि सध्या सर्वोच्च न्यायालयात एक मुख्य न्यायाधीश व 26 इतर न्यायाधीश आहेत.

**२) पात्रता :-**

तो भारताचा नागरिक असावा

तो विद्वान कायदेपंडित किंवा कायदेतज्ञ असावा

उच्च न्यायालयात पाच वर्ष न्यायाधीश म्हणून काम केलेले असावे.

**३) नियुक्ती :-** सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची निवड करण्याचा अधिकार भारताच्या राष्ट्रपतीला आहे भारताचा राष्ट्रपती मुख्य न्यायाधीशाची नियुक्ती करतो व त्याच्या सल्ल्याने इतर न्यायाधीशांची नियुक्ती करतो त्यांना पद व गोपनीयतेची शपथ देतो.

**४) कार्यकाल :-** सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांचा कार्यकाल घटनेत सांगितला नाही परंतु त्यांची वयोमर्यादा सांगितली

सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीश वयाची 65 वर्ष पूर्ण होईपर्यंत पदावर राहू शकतात.

**५) वेतन व भत्ते :-** सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांना अतिशय आकर्षक असे वेतन व भत्ते मिळतात तसेच विविध प्रकारच्या सुविधा मिळतात.

**६) पदावरून दूर करण्याची पद्धत :-** सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांना पदावरून दूर करण्याची पद्धत अतिशय कठीण आहे त्याला महाभियोग असे म्हणतात. भारतात आजपर्यंत सर्वोच्च न्यायालयातील कोणत्याही न्यायाधीशाला पदावरून काढून टाकण्यात आले नाही.

भारतात केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्यातील वाद सोडविणे नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे रक्षण करणे तसेच भारतीय राज्यघटनेच्या रक्षणाची जबाबदारी सर्वोच्च न्यायालयावर आहे सर्वोच्च न्यायालयाला पुढील अधिकार व सत्ता प्राप्त झाली आहे.

**1) प्रारंभिक अधिकार क्षेत्र:-** ज्या खटल्यांचा प्रारंभ सर्वप्रथम सर्वोच्च न्यायालयात होतो अशा खटल्यासंबंधीचे अधिकार म्हणजे प्रारंभिक अधिकार क्षेत्र होय त्यात पुढील खटल्यांचा समावेश होतो

१) केंद्र सरकार विरुद्ध राज्य सरकार यांच्यामधील वाद

२) राज्य सरकार विरुद्ध राज्य सरकार यांच्यामधील वाद

३) नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे वाद

४) घटनेच्या कलमाच्या अर्थाचे वाद.

५) राष्ट्रपतीच्या निवडणुकीसंबंधीचे वाद.

**2) पुनर्निर्णयाचे अधिकार क्षेत्र:-** सर्वोच्च न्यायालयाला पुन्हा निर्णय देण्याचा अधिकार आहे. इतर न्यायालयाने दिलेले निर्णय अयोग्य वाटत असतील तर व्यक्ती सर्वोच्च न्यायालयात खटला दाखल करते त्यालाच पुनर्निर्णयाचा किंवा अपिलीय अधिकार असे म्हणतात

**१) राज्यघटनेच्या अर्थासंबंधीचे वाद:-** राज्यघटनेच्या कलमाच्या अर्था बाबत वाद निर्माण झाला तर सर्वोच्च न्यायालय पुन्हा निर्णय देते.

**२) दिवाणी खटल्याबाबत अधिकार:-** एखाद्या उच्च न्यायालयाने संपत्तीबाबत दिलेला निर्णय अयोग्य वाटत असेल तर सर्वोच्च न्यायालय संपत्तीच्या त्या खटल्यावर पुन्हा निर्णय देते.

**३) फौजदारी खटल्याबाबत अधिकार:-** गुन्हेगारी बाबत खटल्याबाबत उच्च न्यायालयाने दिलेला निर्णय अयोग्य वाटत असेल तर सर्वोच्च न्यायालय त्या गुन्हेगारी खटल्याबाबत पुन्हा निर्णय देते त्यालाच फौजदारी खटल्याबाबत अधिकार असे म्हणतात.

**४) स्वयंनिर्णयाचा पुनर्विचार:-** सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयात कोणत्याही प्रकारच्या चुका राहू नये म्हणून सर्वोच्च न्यायालय स्वतः दिलेल्या निर्णयावर पुन्हा विचार करत असते यालाच स्वयंनिर्णयाचा पुनर्विचार असे म्हणतात.

**५) सल्ला देण्याचा अधिकार:-** भारताचा राष्ट्रपती देशाचा सर्वोच्च प्रमुख आहे राज्यकारभार चालविण्यासाठी तो सर्वोच्च न्यायालयाचा सल्ला मागू शकतो सर्वोच्च न्यायालय त्याला सल्ला देते.

**संदर्भग्रंथ सूची :**

१) प्रा. रा.ज. लोटे, भारतीय शासन आणि राजकारण, पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स नागपूर.

२) प्रा. राम मुठाळ, भारतीय शासन आणि राजकारण अंशुल प्रकाशन.

३) डॉ. छाया बकाणे, भारतीय राजकीय व्यवस्था, श्री विद्या प्रकाशन पुणे

४) तुकाराम जाधव, महेश शिरपूरकर, भारतीय संविधान राजकारण आणि कायदे. युनिक अकादमी प्रकाशन पुणे